दिनांक : .०८.२०१९

प्रति,

**१. माननीय केंद्रीय गृहमंत्री,**
**भारत सरकार, नवी देहली**

**२. माननीय राज्यपाल, आंध्रप्रदेश राज्य**

**विषय : धर्मनिरपेक्ष सरकारकडून अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणासाठी ख्रिश्चन पास्टर, मुस्लिम इमाम आणि मौलाना यांना मासिक वेतन देण्याचा निर्णय रहित करण्याविषयी....**

महोदय,

आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नुकताच अर्थसंकल्प घोषित केला. यात ख्रिश्चन पास्टर, मुस्लिम इमाम आणि मौलाना यांना मासिक वेतन देण्यासाठी २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी सरकारने ९४८.७२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्य सरकारचा हा निर्णय धार्मिक भेदभाव आणि पक्षपात करणार असून विशिष्ट जाती-धर्माची मतपेटी जपण्यासाठी घेतलेला आहे. यामुळे विविध जाती-पंथ आणि धर्म यांच्यात कटुता निर्माण होऊन देशाची एकता-अखंडता धोक्यात येऊ शकते. तसेच हा निर्णय गोरगरीब होतकरू बहुसंख्य हिंदु पुजारी, धर्माचार्य, संत, आचार्य यांच्यावर घोर अन्याय करणारा आहे. एकीकडे 'भारताचे शासन धर्मनिरपेक्ष आहे', 'शासनाच्या दृष्टीने सर्वधर्म समान आहेत', असे म्हणायचे आणि दुसरीकडे केवळ ख्रिश्चन अन् मुस्लिम धर्मियांच्या धार्मिक व्यक्तींना वेतन द्यायचे, हे घटनेच्या कोणत्या तत्त्वात बसते ? एकाच देशात रहाणाऱ्या; पण वेगवेगळ्या धर्माच्या लोकांना वेगवेगळा न्याय असे का ? असे करणे म्हणजे लोकशाहीच्या तत्त्वांना काळीमा फासण्यासारखे आहे.

*** तरी या अनुषंगाने लक्षात आलेल्या गोष्टी येथे देत आहोत.....**

१. मुळात भारतीय राज्यघटनेत असलेलला अल्पसंख्यांक या शब्दाची व्याख्याच स्पष्ट झालेली नसल्यामुळे अल्पसंख्यांक कोणाला म्हणावे ? हे स्पष्ट होत नाही. तसेच मागील कॉंग्रेस शासनाने मुस्लिम-ख्रिश्चन यांचे तुष्टीकरण करण्यासाठी वर्ष १९९२ स्थापन अल्पसंख्यांक विभाग आणि आयोग घटनाबाह्य ठरतो; कारण देशात जाती, धर्म, पंथ, समुदाय यांच्या आधारे जनतेमध्ये भेदाभेद करणे राज्यघटनेतील समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. त्यामुळे अल्पसंख्यांक म्हणून दिलेला लाभ हा घटनाबाह्य आहे.

२. यापूर्वीच्या कॉंग्रेस शासनाने मुस्लिमांच्या हजयात्रेसाठी दिले जाणारे हजारो कोटी रुपयांचे अनुदान सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवत ते शासनाला बंद करण्यास सांगितले होते. तसेच केंद्रातील मोदी सरकारने हजयात्रेचे अनुदान बंद केले आहे. तसेच अनेक राज्यांनी त्या त्या राज्यात धर्माच्या आधारे दिलेले मुस्लिम आणि ख्रिश्चन आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रहित केले आहे. त्यामुळे पुन्हा जात-पंथ आणि धर्म यांच्या आधारे सवलत देणे, हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे.

३. एकीकडे देशात सरकार सर्वत्र केवळ हिंदूंच्याच मंदिरांचे सरकारीकरण करून मंदिरांच्या तिजोरीतील कोट्यवधी रुपयांचा निधी विकासाच्या नावाखाली अल्पसंख्यांकांच्या तुष्टीकरणासाठी वापरते. यात हिंदूंच्या मंदिरातील पुजाऱ्यांना सरकार कधीही एक रुपयांचेही वेतन देत नाही.

४. देशातील एकूण लोकसंख्येत ७० प्रतिशतहून अधिक हिंदूंची संख्या असून ते बहुसंख्यांक आहेत. तसेच देशात कर आणि श्रम यांतून जमा होणारा पैसा हा बहुसंख्य हिंदूंचा आहे. असे असतांना हिंदूंचा पैसा केवळ धर्म-पंथ यांच्या आधारे मुस्लिम-ख्रिश्चन यांना देणे आणि हिंदूंना नाकारणे हा हिंदू समाजाशी केलेला द्रोह

आहे. यातून हिंदूंमध्ये तीव्र संताप आणि असंतोष निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाही.

५. केवळ ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मियांच्या धार्मिक व्यक्तींना वेतन दिल्यामुळे शासन धर्माच्या आधारावर योजना राबवून धार्मिक भेदभाव करत असल्याचा संदेश समाजात जाईल.

६. केवळ 'हिंदू' असल्याने शासकीय सुविधा मिळत नाहीत, असा संदेश याद्वारे जनतेमध्ये जाईल आणि त्यामुळे हिंदूंमध्ये अन्यायाची भावना वाढीस लागून 'शासन हिंदूविरोधी आहे', असे मत निर्माण होईल.

७. एका राज्यात जर अशाप्रकारे वेतन चालू झाले, तर अन्य राज्यांतही ख्रिस्ती आणि मुस्लिम अशी मागणी करतील अन् जर अन्य राज्यांनी या निर्णयाचे अनुकरण केले, तर देशात अराजक माजल्याशिवाय रहाणार नाही.

८. सरकारच्या अशा निर्णयामुळे हिंदु समाजामध्ये सातत्याने आपल्यावर केवळ 'हिंदु' आहोत, म्हणून अन्याय केला जात आहे, ही भावना वाढीस लागत आहे. अशीच स्थिती कायम राहिली, तर राज्यातील पर्यायाने देशातील सामाजिक सलोखा बिघडू शकतो. त्यामुळे तातडीने केंद्रशासन आणि राज्यपाल यांनी यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे.

**※ तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत....**

१. धर्मनिरपेक्ष सरकारकडून अल्पसंख्यांकांच्या तुष्टीकरणासाठी केवळ ख्रिश्चन पास्टर, मुस्लिम इमाम आणि मौलाना यांना मासिक वेतन देण्याचा आंध्रप्रदेश राज्य सरकारचा निर्णय तात्काळ रहित करावा.

२. देशातील लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवायची असेल, सर्व जाती-पंथ यांना समानतेची वागणूक द्यायची असेल, तर धर्म, जात, पंथ आणि वर्गविशेष समुदाय यांच्या आधारावर देण्यात येणाऱ्या सुविधा कायमच्या रहित करण्यासाठी संपूर्ण देशात 'समान नागरी कायदा' लागू करण्यात यावा.

आपला विश्वासू,

संपर्क :